# सज्जाद हुसेन - भाग ३



सज्जाद हुसेन हे मुंबईतील माहीम येथील पवित्र मखदूम चिस्ती यांच्या दर्ग्याजवळ रहात असत. त्यांच्या शेवटच्या वर्षांत त्यांनी लोकांत मिसळण्याचे एकदम बंदच करून टाकले. घराच्या बाहेरही ते क्वचितच जात असत. दूरदर्शन किंवा आकाशवाणी यांपैकी कुठेही ते मुलाखत देत नसत. अशा वेळी हिंदी चित्रपट गीतांचे रसिक चाहते असलेल्या, 'पीआयए' च्या सुलतान अर्शद यांनी, सज्जाद यांच्याकडून सज्जदच्याच घरी, गेल्या जमान्यातील दिग्गज कलावंत अनिल विश्वास आणि ओ. पी. नय्यर यांना आमंत्रण देऊन अनपेक्षितपणे चहाची मैफिल जमविली. ही गोष्ट १९९४ सालची आहे.

ह्या मैफिलीबद्दल ओ. पी. नय्यर म्हणाले की हे म्हणजे पर्वताने मोहम्मदाकडे जाण्यासारखे आहे. सज्जादबद्दल अनिल विश्वास असे म्हणाले की सज्जाद हे एकमेव असे कलावंत आहेत की जे संपूर्णपणे आपल्या स्वत:च्या कल्पनेतूनच संगीतरचना करतात. इतरांबद्दल बोलायचे झाल्यास कोण कुठून तर कोण कुठून थोडीफार उचलेगिरी करतोच, परंतु सज्जाद यांचे मात्र तसे नाही.

अनिल विश्वास यांचे उद्गार खरेच आहेत. सज्जाद यांची वर उल्लेखिलेली काही गाणी आणि चित्रपटातील रेकॉर्ड केलेली परंतु उजेडात न आलेली काही गाणी हेच सिध्द करतात. अशीच आणखी दोन गाणी म्हणजे 'शिकवा' चित्रपटातील तलतने म्हटलेले 'खुशी दिल की बरबादियाँ साथ लायी' आणि 'प्रीत न जाने रीत' मधील राजिन्दर किशन यांनी लिहिलेले 'तेरी गलीसे गुजरके ये रात आयी है' ही दोन गाणीही उदाहरणादाखल देता येतील.

थोर संगीतकार अनिल विश्वास यांचा शेरा योग्यच आहे, कारण स्वत: त्यांनीच बांधलेले ('जासूस'-तलत) 'जीवन है मधुबन' हे गाणे सरळ सरळ 'के सेरा सेरा, वॉटेव्हर विल बी, विल बी' ('दि मॅन हू न्यू टू मच') या गाण्याची नक्कलच आहे.

२१ जुलै १९९५ रोजी सज्जाद यांनी अखेरचा श्वास घेतला. ते तेव्हा ७८ वर्षांचे होते. १९५६ साली कलकत्ता येथे उपस्थित असलेल्या दिग्गजांसमोर सर्व वाद्यांतून निवडलेल्या मँडोलिनवर कठीण असा 'मींड' वाजवून उपस्थितांना थक्क करून सोडले. हे दैदिप्यमान तारे कोण होते असे विचाराल तर ते होते उस्ताद अल्लाउद्दिन खान, बडे गुलाम अली खान, अहमदजान थिरकवा, निखिल बॅनर्जी, अली अकबर खान आणि पंडित विनायकराव पटवर्धन.

ज्या माणसाने सर्वांना थक्क करून चैतन्य निर्माण केले त्यांच्यामधील चमक मात्र आता कमी झाली. त्यांचा सुवर्ण काळ आला आणि गेलाही, परंतु आपल्या पश्चात सुंदर गाण्यांचा एक छोटा खजिना मात्र ते रसिकांसाठी सोडून गेले.

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com